साहसे श्रीः प्रतिवसति।

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

**अगस्ति कला,वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,अकोले**

**ता. अकोले, जि. अहिल्यानगर पिन.४२२६०१**

# कनिष्ठ महाविद्यालय

## प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६

## प्रवेशाबाबत महत्वाच्या सूचना

**इ.१० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!**

१. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता आश्रमशाळा, सैनिक शाळा, HVSC अभ्यासक्रम वगळून राज्यपातळीवर इ.११ वी वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता **महाराष्ट्र शासनाने केंद्रिय प्रवेश पध्दतीने प्रवेश देण्याचा शासन निर्णय दि.२५/०२/०२५ व दि.०६/०५/२०२५नुसार जाहीर केलेला आहे** व त्यासंदर्भाने सर्व सविस्तर आणि स्पष्ट सूचना त्यामध्ये दिलेल्या आहेत.

२. **ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया आयोजन :-**

**अ.** सर्व प्रथम विद्यार्थ्यांना **वेबसाईट https://mahafyjcadmission.in** या संकेतस्थळावर जावून रजिस्ट्रेशन (नोंदणी) करावयाची आहे.

**ब. नोंदणी प्रक्रिया सोमवार, १९/०५/२०२५ ते बुधवार, दि.२८/०५/२०२५ या कालावधीत** सुरु असणार आहे.

**क.**राज्यमंडळा व्यतिरिक्त इतर मंडळामधून (CBSC/ICSE) इ.१० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना HSC बोर्ड महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी देखील नोंदणी करणे बंधनकारक आहे.

**ड.** प्रवेश प्रक्रियेत एकूण ४ फेऱ्या होणार आहे.

३. विद्यार्थ्यांना एका वेळी एक प्रवेश अर्जाव्दारे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेपैकी प्रत्येक फेरीमध्ये एका शाखेची निवड करता येईल. प्रत्येक फेरीच्या वेळी शाखा बदल करण्याची संधी विद्यार्थ्यांना असेल.

४. **ऑनलाईन रजिस्ट्रेशन पुर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना User ID (लॉगीन आयडी) व Password तयार** होवून तो स्क्रीनवर दिसेल त्यांची काळजीपूर्वक नोंद विद्यार्थ्यांनी ठेवावयाची आहे. सर्व प्रवेश प्रक्रियेकरिता User ID (लॉगीन आयडी) व Password आवश्यक आहे.

५. रजिस्ट्रेशन फी रुपये १००/- इतकी असून ती ऑनलाईन भरावयाची आहे.

६. यापुढे विद्यार्थ्यांनी **User ID (लॉगीन आयडी) व Password** वापरुन कनिष्ठ महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम निश्चित करावयाचा आहे. जास्तीतजास्त १० महाविद्यालयांना प्राधान्यक्रम देण्याची सुविधा आहे.

७. प्रथम पसंती क्रमाकांस प्रवेश मिळाल्यास अशा विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित न केल्यास त्या सर्वांसाठी खुला (Open to All) या फेरीपर्यंत दुसरी/तिसरी व चौथ्या फेरीमध्ये सहभागी होता येणार नाही. नियमित फेरीमध्ये प्रथम प्राधान्य क्रम दिलेल्या विद्यार्थ्यांना निवड केलेल्या महाविद्यालयात जागा मिळाल्यास तेथे प्रवेश घेणे बंधनकारक असेल. तेथे जागा मिळूनही प्रवेश न घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही, मात्र अशा विद्यार्थ्यांसाठी सर्वांसाठी खुला (Open to All) या प्रवेश फेरीमध्ये सहभागी होता येईल.

८. सर्व प्रवेश हे शासकीय नियमानुसार **सामाजिक आरक्षण,समांतर आरक्षण, व्यवस्थापन कोटा, Inhouse कोटा** इत्यादींसाठीच्या आरक्षित जागांचे प्रमाण शासनाच्या प्रचलित धोरणानुसार राहील.

९. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेशावेळी आरक्षित प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे स्वतःचा जातीचा दाखला असावा. सदर प्रवेशित विद्यार्थ्याचा जातीचा दाखला नसल्यास वडिलांचा जातीचा दाखला आरक्षित प्रवर्गाकरिता ग्राहय धरता येईल.

१०. विद्यार्थ्याने प्राधान्य क्रम भरल्यानंतर मिळालेल्या महाविद्यालयात प्रत्यक्ष जावून प्रवेश घ्यावयाचा असेल तर स्वतः विद्यार्थ्याने जावून आपला प्रवेश निश्चित करावा.

**फॉर्म नं.१.- https://mahafyjcadmission.in या संकेतस्थळावर जावून रजिस्ट्रेशन (नोंदणी) करणे. नोंदणी झाल्यानंतर लॉगीन कोड आणि पासवर्ड कोड प्रसिध्द होईल याची नोंद घ्यावी. रजिस्ट्रेशन फी रुपये १००/- ऑनलाईन पध्दतीने भरावी.**

**फॉर्म नं.२.- विद्यार्थ्याने १ ते १० प्रमाणे प्रवेशाकरिता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राधान्य क्रम भरावेत.**

**नियमित फेरीमध्ये (१,२,३....) प्रवेश प्राप्त झालेल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्याने स्वतः जावून आपली मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती वेळापत्रकाप्रमाणे विहित मुदतीत दिलेल्या सूचनांनूसार सादर करुन महाविद्यालयात फी भरुन आपला प्रवेश निश्चित करावा.**

११. **शासनाकडून प्रवेशासंबंधी वेळोवेळी जे बदल होतील ते सर्वांवर बंधनकारक राहतील.**

(डॉ. भास्कर शेळके)

प्राचार्य

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान

महाविद्यालय, अकोले, ता.अकोले, जि.अ.नगर

दि.१६/०५/२०२५